
# १८. पैशांचे व्यवहार

- **खालील चित्रे पाहा. पैशांचे व्यवहार कोठे कोठे होतात ते सांगा.**

















## स्वाध्याय

**प्र. १. वरील चित्रांत दाखवलेल्या ठिकाणांना पालकांसोबत भेट द्या. तेथे काय काय पाहिले ते वर्गात सांगा.**

**प्र. २. बँकेत चालणारे पैशांचे कोणतेही दोन व्यवहार सांगा.**

**प्र. ३. जोड्या जुळवा.**


| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (१) | विजेचे बिल भरणे | (अ) | पोस्ट ऑफिस |
| (२) | मनिऑर्डर करणे | (आ) | दूरध्वनी केंद्र |
| (३) | फोनचे बिल | (इ) | वीज देयक केंद्र |

AJ9PQS

**प्र. ४. दुकानात जा. खालील वस्तूंचे भाव माहीत करून घ्या. किंमत लिहा.**




चित्रकला वही — किंमत ₹



स्केचपेन बॉक्स — किंमत ₹



कंपास — किंमत ₹



शाळेचे बूट — किंमत ₹



छत्री — किंमत ₹



दप्तर — किंमत ₹

**प्र. ५. बँकेत चालणाऱ्या व्यवहारांपुढे ✓ अशी खूण करा. बँकेत होत नसलेल्या व्यवहारांपुढे × अशी खूण करा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. पैसे भरणे. | ☐ | ५. मनिऑर्डर करणे. | ☐ | ९. वीज बिल भरणे. | ☐ |
| २. पैसे काढणे. | ☐ | ६. विम्याची रक्कम भरणे. | ☐ | १०. कर्ज घेणे. | ☐ |
| ३. पत्र टाकणे. | ☐ | ७. दागिने सुरक्षित ठेवणे. | ☐ | ११. दागिने गहाण ठेवणे. | ☐ |
| ४. चेक देणे. | ☐ | ८. चेक वटवणे. | ☐ | १२. मुदत ठेवीच्या योजना. | ☐ |

**उपक्रम :** भाजी मंडईला भेट द्या. तेथे विकल्या जाणाऱ्या भाज्यांची यादी करा. भाज्यांचे प्रतिकिलो दर विचारा. 'भाजी मंडई' यावर पाच ते सात वाक्ये माहिती लिहा.

**वाचू आणि हसू.**



**सोनू** : मिनू, माझ्या बाबांनी कालच 'इनोव्हा कार' घेतली. आता आमच्याकडे तीन गाड्या झाल्या.

**मिनू** : अरे सोनू, माझ्या बाबांकडे कार, स्कूटर, रेल्वे, अगदी विमानसुद्धा आहे.

**सोनू** : अरे वा! मग तर तू सगळ्याच वाहनांतून फिरली असशील!

**मिनू** : नाही रे! माझ्या बाबांचं खेळण्यांचं दुकान आहे ना!

- **लिहा.**

**दिलेल्या अक्षरांपासून सुरू होणारे शब्द लिहा.**

